# संगीत शिक्षणाचे महत्व व शालेय विद्यार्थ्यांची संगीत शिक्षणाकडे ओढ

**डॉ. मांडवगडे शुभदा**
सहयोगी प्राध्यापक व संगीत विभाग प्रमुख
सेवादल महिला महाविद्यालय, नागपूर.

## सारांश

शिक्षण हे केवळ सुशिक्षित करण्यासाठी नाही तर ते सुसंस्कारित करण्यासाठी असते. संस्काराचा आत्मा जेव्हा हरवतो त्या वेळेला राष्ट्रीय चारित्र्य कसे घडवावे हा प्रश्न उभा राहतो. त्यामुळे वैज्ञानिक प्रगती होत असतांना नैतिकता लयाला जाऊ नये याची जाणीव ठेवणे आवश्यक असते. यासाठी देशाला संस्कारक्षम, मूल्याधारित व विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास करणाऱ्या शालेय शिक्षणाची गरज आहे. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास करण्यासाठी मूलभूत विषयांच्या शिक्षणासोबतच कौशल्य आधारित (जसे-संगीत, चित्रकला, खेळ, शारीरिक शिक्षण, साहित्य इ.) विषयांचे शिक्षणही महत्वपूर्ण भूमिका निभावते. कौशल्य आधारित शिक्षणामध्ये संगीत कलेचाही समावेश होतो. संगीत हा मानवी जीवनाचा अभिन्न अंग आहे. मानवी शरीर, मन, आत्मा व बुद्धिशी संगीताचा प्रत्यक्ष संबंध येतो. त्यामुळे विद्यार्थ्यांचा शारीरिक, मानसिक, बौद्धिक, सामाजिक असा सर्वांगीण विकास करण्यासाठी शालेय अभ्यासक्रमामध्ये संगीत शिक्षणाचा समावेश केलेला आहे. परंतु अजूनही इतर शालेय विषयांच्या तुलनेत संगीताला दुय्यमच स्थान मिळते आहे. याशिवाय संगीत शिकण्यासाठी आज खाजगी शिकवणी वर्ग, संगीत विद्यालये, गुरूकुल आणि आधुनिक तंत्रज्ञान उपलब्ध आहेत. तरीसुद्धा संगीत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाण फार कमी दिसून येते. शहरी भागात काही प्रमाणात विद्यार्थी संगीत शिकायला सुरूवात करतात पण अर्धवट सोडून जातात.प्रस्तुत शोध पत्रामध्ये याचे कारण शोधण्याचा व त्यावर काय उपाययोजना करता येतील याचा अभ्यास संशोधकाने मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे.

**नमुना शब्द** : संगीत, शालेय शिक्षणात संगीताचे महत्व व स्थान, शालेय विद्यार्थ्यांची संगीत शिक्षणाकडे ओढ, कारणे व उपाययोजना

## प्रस्तावना

**को**णत्याही देशाचे भवितव्य आणि त्या देशाच्या विकासाची गती ही त्या देशात मिळणाऱ्या शिक्षणावर आणि शिक्षणाच्या गुणवत्तेवर अवलंबून असते. देशाला आर्थिक महासत्ता आणि प्रभावी राष्ट्र बनविण्यात युवा वर्गाची महत्वपूर्ण भूमिका असते. म्हणजेच विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळाले तर आपोआपच देशाचा विकास साधला जातो असे म्हणता येईल.शिक्षण हे परिवर्तनाचे प्रभावी माध्यम मानले गेले आहे. सुसंस्कारित जीवन जगण्यासाठी, समाजात राहून समाजहिताचे कार्य करण्यासाठी प्रयत्नपूर्वक दिलेल्या शिक्षणाची आवश्यकता आहे. प्राचीन काळात अविकसित समाजात शिक्षणाचे कार्य अनौपचारिक पद्धतीने चाले.पुढे समाजाचा विस्तार हळूहळू वाढत गेला, नवनविन गोष्टींची माहिती मिळवण्याचा प्रयत्न मनुष्य करू लागला व ज्ञानाच्या कक्षा वृंदावल्या गेल्या. यातूनच शिक्षणाचे, ज्ञानदानाचे व व्यक्तित्व विकासाचे कार्य स्वतंत्रपणे करणाऱ्या यंत्रणेची गरज निर्माणझाली आणि शाळा या सामाजिक संस्थेची निर्मिती झाली. विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा व व्यक्तिमत्वाचा पाया शाळेतच रचला जातो. शाळेत मिळालेल्या शिक्षणाच्या आणि संस्कार, मूल्यांच्या आधारावरच विद्यार्थ्यांचे पुढील जीवनातील यश अवलंबून असते. डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम म्हणतात,‘‘शिक्षणाने माणसात सर्जनशीलता येते, सर्जनशीलतेने प्रगल्भ विचार येतात व विचाराने ज्ञान वाढते.’’विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास करणे हे शिक्षणाचे मुख्य उद्दिष्ट आहे. त्यासाठी शालेय शिक्षणातविविध विषयांच्या अध्ययन.अध्यापनासोबतच अभ्यासपूरक उपक्रमांनाही महत्व देणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांना शिक्षणासमवेत खेळ, संगीत, विविध कला, शारीरिक शिक्षण, नैतिक मूल्य यांचेही शिक्षण

मिळाले तर त्यांचा सर्वांगीण व्यक्तिमत्व विकास घडवून आणता येऊ शकतो. त्यातही संगीताला शास्त्र व कला या दोन्हींचीमान्यता मिळालेली असून संगीताचा मानवी जीवनाशी जवळचा संबंध आहे. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण व्यक्तिमत्व विकास घडवून आणण्यासाठी आवश्यक असलेले सर्व गुण संगीत कलेत अंतर्भूत आहेत. अनेक मनीषींनी, विद्वानांनी विद्यार्थ्यांच्या शरीर, मन व बुद्धिचा विकास करणारी व आत्मविश्वास निर्माण करणारी शिक्षणप्रणाली विकसित करण्याचीगरज व्यक्त केलेली आहे आणि हे सामर्थ्य संगीत कलेमध्ये आहे.

## 1. संगीत

संपूर्ण विश्वाला नादमय करणारी, विविध भाषांच्या बंधनाच्या वर स्वत:चीच एक भाषा असलेली, पशु-पक्षी, मनुष्य व सर्व सजीव सृष्टीला मोहित करणारी, चौसष्ट कलांमध्ये सर्वश्रेष्ठ मानली जाणारी कला म्हणजे संगीत होय. संपूर्ण ब्रह्मांड एका विशिष्ट अंतर्नादामध्ये,एका विशिष्ट लयीमध्ये बांधला गेलेला आहे आणि याच नाद व लयातून निर्मिती झाली ती संगीताची, सात सुरांची.

'पशु: शिशुर्मुगो वादि नादेन परितुष्यती
अतो नादस्य माहात्म्यं व्याख्यातुं केन शक्यते'

अर्थात नादाचा महिमा अपार आहे. मनुष्यासोबतच पशु-पक्षी, जीव-जंतु, चल-अचल सर्वांवरच याचा प्रभाव दिसून येतो. मानवी जीवनाचा प्रत्येक क्षण हा संगीताने व्यापलेला आहे. मानवी इतिहासात प्राचीन काळापासूनच संगीत मानवाला प्रिय असल्याचे दिसून येते. प्रसंग आनंदाचा असो वा दु:खाचा तो संगीताशिवाय साजरा करताच येत नाही. प्लेटोने म्हटले आहे,'Music is a moral law. It gives a soul to the universe, wings to the mind, flight to imagination, a charm to sadness and gaiety and life to everything.'

## 2. शालेय शिक्षणात संगीताचे महत्व

मुळात शिक्षण या संज्ञेतच व्यक्तीच्या सर्वांगीण विकासाचा अर्थ दडलेला आहे. नेल्सन मंडेला म्हणतात, 'शिक्षण कोणतेही असो ते सर्वात शक्तिशाली शस्त्र आहे, ज्याचा वापर जग बदलण्यासाठी करता येतो.' प्रत्येक देशाचा विकास हा त्या देशाच्या संस्कृतीच्या शिक्षणावर अवलंबून असतो. जगभरातल्या जवळजवळ सर्व देशांच्या संस्कृतीचा संगीत हा अविभाज्य घटक आहे. धार्मिक विधी, उत्सव व समारंभ, नृत्य, नाटक, चित्रकारी, कथनादि कार्यक्रम, विशिष्ट व्यायामप्रकार, जादूच्या खेळासारखे रंजनप्रकार असे अनेकविध सांस्कृतिक आविष्कार संगीताची जोड देऊन सादर केले जातात,किंबहूना या संगीतसाथीने त्यांच्या आस्वादात, भावात अधिकची भर पडते. संगीताला एक परंपरा आहे, एक विशिष्ट मूल्य आहे. संगीत,परंपरा व संस्कृतीचे वाहक आहे व मानवाच्या अभिव्यक्तीचे एक साधन आहे. त्यामुळे संगीत शिक्षणाला महत्व प्राप्त होणे स्वाभाविक ठरते.

शालेय - महाविद्यालयीन शिक्षणक्रमांत संस्कृतीच्या विविध अंगो-पांगांचा अभ्यास केला जातो व संस्कृती कोणतीही असो ती संगीत कलेशिवाय अपूर्ण आहे. त्यामुळे संपूर्ण जगात शालेय अभ्यासक्रमात संगीत शिक्षणाला स्थान प्राप्त झालेले दिसून येते. विद्यार्थ्यांच्या दृष्टिकोणातून बघितले तर विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण व्यक्तिमत्व विकासात संगीत शिक्षण उपयुक्त ठरते हे शास्त्रज्ञांनी सिद्ध केलेले आहे. ग्रीक तत्ववेत्ताप्लेटोने आपल्या राज्यातील शालेय शिक्षणात संगीत व व्यायाम हे दोन विषय अनिवार्य केले होते. त्याचे महत्व त्यांनी अचूकपणे जाणले होते. प्राचीन काळी रोम व ग्रीक राज्यांमध्ये लहान मुलांना विविध भावना, संवेदनशीलता व सर्जनशील वृत्तीची निर्मिती होण्यासाठी संगीत शिकवले जाई. ध्वनी ही एक भौतिक क्रिया असल्यामुळे त्याचा मेंदू, हृदय व एकंदरीतच संपूर्ण शरीरावर परिणाम दिसून येतो. संगीतामुळे आपल्या शरीरात प्रसन्नता, चैतन्य, ऊर्जा, शाररिक बळ यांचा संचार होऊन शरीरात प्राणवायूची वृद्धी होते. त्यामुळे मानसिक समाधान, स्थैर्य, शांती, दया, प्रेम, करूणा, औदार्य, क्षमा, आत्मीयता व सौजन्य विविध भावभावना अंतर्मनात जागृत होतात.

शालेय शिक्षणाचा मुख्य उद्देश म्हणजे विद्यार्थ्यांच्या बुद्धिमत्तेचा विकास करणे, जीवनातीलनैतिक मुल्यांचे संगोपन आणि संवर्धन करण्याची जाणीव निर्माण करणे, चारित्र्यसंपन्न व्यक्तिमत्व घडवणे हे होय.त्यादृष्टीने संगीत शिक्षण फारच महत्वपूर्ण ठरते कारण संगीत कलेत विविध मूल्यांचा (जसे -बौद्धिक मूल्य, उपयोजन मूल्य, सांस्कृतिक मूल्य, नैतिक मूल्य, व्यावसायिक मूल्य, सौदर्य मूल्य, कलेच्या प्रशिक्षणाचे मूल्य, वैज्ञानिक मूल्य) विकास करण्याची शक्ती आहे. संगीत स्वत: एक विज्ञान आहे. संगीताचा इतर शालेय विषय जसे भाषा, गणित, विज्ञान, भूगोल, इतिहास, सामाजिक शास्त्रे, अभ्यासपूरक कार्यक्रम यांच्याशी घनिष्ठ संबंध आहे. संगीताच्या सहाय्याने हे विषय शिकणे सहज साध्य होते. संगीतातील नाद व स्वरांना 'मंत्रशक्ती' असे म्हटले आहे. त्यामुळे मन एकाग्र व शांत करण्याची शक्ती यात आहे. आजच्या तणावपूर्ण जीवनातील वातावरणात, मग ती विद्यार्थी दशेतील वा तरूण पिढीतील मुले असोत, नोकरी किंवा व्यवसाय करणारे स्त्री-पुरूष असोत वा वृद्ध असोत या सर्वांनाच एक निरोगी जीवन देण्यासाठी संगीत खरोखरच संजीवनीचे काम करते. त्यामुळे अशा सांगितिक वातावरणाची सुरूवात शालेय जीवनापासूनच होणे आवश्यक आहे.

### 3. शालेय शिक्षणात संगीताचे स्थान

शालेय शिक्षणाचा आढावा घेतल्यासआपल्याला असे लक्षात येते की, शाळेमध्ये भाषा, गणित, विज्ञान, सामाजिक शास्त्र इ. विषयांचे मूलभूत ज्ञान देण्यावर अधिक भर दिल्या जातो. या सर्व विषयांचा समावेश शैक्षणिक उपक्रमांमध्ये केला जातो. माध्यमिक शालेय शिक्षणाचा स्तर सुधारण्यासाठी व त्यात आमुलाग्र बदल करण्यासाठी १९५२-५३ साली मुदलियार आयोगाची (माध्यमिक शिक्षण आयोग) स्थापना करण्यात आली. या आयोगाने आपल्या अहवालात लोकशाही नागरिकत्वाचा विकास करणे, विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्वाचा विकास करणे, नेतृत्वगुणांचा विकास करणे अशी शिक्षणाची व्यापक उद्दिष्टे मांडली. या उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी त्यांनी आपल्या अहवालातजे विविध कार्यक्रम सुचविले त्यात त्यांनी शैक्षणिक उपक्रमांसोबतच अभ्यासपूरक उपक्रमांनाही महत्वपूर्ण स्थान दिले. संगीत, चित्रकला, खेळ, शारीरिक शिक्षण, कार्यानुभव, विविध सांस्कृतिक कार्यक्रम या सर्वांचा अंतर्भाव अभ्यासपूरक उपक्रमांमध्ये होतो. संगीत हे मनोरंजनाचे माध्यम असले, तरी त्याचे शिक्षण आध्यात्मिकशिक्षणासारखेच घेतले जाते. संगीताला व्यक्तिमत्व विकासातील एक घटक मानल्या जाते. पूर्वी संगीत शिक्षण सहज शिकणे कठिण होते. परंतु पं. भातखंडे व पं. पलुस्कर यांनी संगीताच्या पुनरूत्थानासाठी प्रचंड परिश्रम घेतले आणि सर्वांसाठी संगीत शिक्षण सुलभ व्हावे यासाठी प्रयत्न केले. त्यामुळेच शाळेमध्ये इतर विषयांप्रमाणेच संगीताला एक विषय म्हणून स्थान मिळाले. पण खरच संगीताला शालेय शिक्षणात महत्व दिले जात आहे?इतर विषयांप्रमाणेच संगीताचा दर्जात्मक अभ्यासक्रम आहे? इतर विषयांसाठी जशी विषय शिक्षकांची नेमणूक होते असते, तशी संगीत शिक्षकांची नेमणूक शाळेमध्ये होते? या सर्वांचे उत्तर बहुतांशी 'नाही' असेच मिळेल. कारण विज्ञानाची जसजशी प्रगती होत गेली, तसतसे शिक्षणातून अभ्यासपूरक उपक्रमांचे महत्व कमी होत गेले आणि संगीत विषयाचे स्थानही गौण ठरू लागले. अभ्यासपूरक उपक्रमांबद्दल विद्यार्थी जरी उत्सुकअसले, तरी त्यांचे पालक व इतर विषय शिक्षकांमध्ये उदासीनता दिसून येते. अभ्यासाच्या दृष्टिने त्यांना विशेष महत्व नाही हीच सर्वांची भावना आहे. एवढेच नव्हे तर अशा कार्यक्रमांचे प्रमाण वाढले तर त्यामुळे विद्यार्थ्यांचा अभ्यास बुडतो, त्यात विद्यार्थी व शिक्षक दोघांचाही वेळ वाया जातो, अभ्यासक्रम पूर्ण होत नाही इ. तक्रारी शिक्षक व पालक यांच्याकडून अनेकदा केल्या जातात. त्यामुळेशाळांमधील संगीत विषयाच्या तासिका कमी होत चालल्या आहेत आणि संगीत शिक्षकही. सध्या शाळेची सकाळची प्रार्थना, विविध शालेय कार्यक्रम, स्पर्धा व वार्षिक स्नेहसंमेलनापुरतेच संगीत शाळांमधून ऐकू येते.

### 4. शालेय विद्यार्थ्यांची संगीत शिक्षणाकडे ओढ

प्रत्येक व्यक्तीमध्ये बुद्धिमत्तेच्या जोडीला एखाद्या कलेविषयी प्रेम, आवड ही सुप्तपणे

मनामध्ये दडलेली असते. व्यक्तीचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी त्याचा केवळ बौद्धिक विकास साधून चालत नाही, तर त्याच्यातील कलेच्या प्रकटीकरणाला वाव मिळणे आवश्यक असते आणि ते संगीत शिक्षणाच्या माध्यमातून साध्य करता येते. विद्यार्थी जीवनात संगीत शिक्षणाला फार महत्व आहे हे अनेक संगीततज्ञांनी व शास्त्रज्ञांनी मान्य केलेले आहे. संगीत ही मुख्यत्वे ऐकून शिकण्याची, श्राव्य स्वरूपाची विद्या असल्याने, त्याच्या अध्ययन प्रक्रियेत निष्ठापूर्वक श्रवण भक्तीला अनन्यसाधारण महत्व आहे. पूर्वी संगीत हे विशिष्ट लोकांपूरतेच मर्यादित होते, सामान्य लोकांना शिकणे ते सहज नव्हते. परंतु अनेक संगीततज्ञांनी केलेल्या परिश्रमामुळे संगीत सर्वांसाठी उपलब्ध झाले. विसाव्या शतकात झालेल्या इलेक्ट्रॉनिक क्रांतीमुळे, रेडिओ, ध्वनिमुद्रिका, रेकॉर्डप्लेअर, व्ही.सी.आर., टी.व्ही. इ. तांत्रिक साधन सुविधांच्या उपलब्धीमुळे तर संगीत घराघरात पोहोचले आहे. परंतु तंत्रज्ञानाने संगीताचा झपाट्यने प्रचार प्रसार झाला असला तरीही शालेय विद्यार्थ्यांची संगीत शिक्षणाकडे ओढ फार कमी दिसून येते. हल्ली टीव्हीवर प्रसारित होणाऱ्या रिएॅलिटी शो मुळे, सोशल मीडियामुळे संगीताला खूप प्रसिद्धी मिळत आहे. अशा कार्यक्रमात आपली चमक दाखवावी असे मुलांना वाटत असते व त्यांचे पालकही उत्साहाने त्यांना संगीताच्या क्लासमध्ये पाठवतात. पण ही उत्सुकता काही काळचटिकून असते. कारण शालेय शिक्षणाच्या तुलनेत आजही संगीताचे स्थान विद्यार्थ्यांच्या जीवनात दुय्यमच आहे. संगीताकडे अजूनही करिअर म्हणून न पाहता विरंगुळा म्हणूनच बघितल्या जाते.

विद्यार्थी म्हणून शाळेत अध्ययन करीत असतांना व 'शालेय विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासात संगीत शिक्षणाचे स्वरूप, महत्व आणि मार्गदर्शक उपक्रमांचे विकसन – एक अभ्यास' या विषयांतर्गत संशोधन करीत असतांना मी विद्यार्थ्यांच्या संगीत विषयक विचारांचे, सांगीतिक जाणिवांचे जवळून निरीक्षण केले आहे. त्यात मला असे आढळून आले की, अनेक विद्यार्थ्यांना गाणी म्हणायला, नृत्य करायला, विविध वाद्ये वाजवायला आवडतात. शालेय सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये भाग घ्यायलाही त्यांना आवडते. परंतु विद्यार्थ्यांना संगीत शिक्षणात विशेष अभिरूची दिसून येत नाही किंवा तसा प्रयत्नही होतांना दिसत नाही. शहरी भागात संगीत शिक्षण उपलब्ध असल्याने काही विद्यार्थी संगीत शिकायला जातात, तेही फक्त आवड म्हणूनच. शिक्षणासोबत एखादी कला अंगात असावी एवढाच हेतू त्यामागे विद्यार्थी व त्यांच्या पालकांचा असतो. परंतु शैक्षणिक दृष्टीने, सर्वांगीण व्यक्तिमत्व विकासाच्या दृष्टिने व करिअर घडविण्याच्या दृष्टिने संगीत शिक्षण किती महत्वपूर्ण आहे, याची कल्पना त्यांना अजूनही नाही. ग्रामीण भागात अनेक ठिकाणी सांगीतिक प्रतिभा असलेले विद्यार्थी आहेत परंतु त्यांना संगीत शिक्षण म्हणजे काय? हेच माहीत नाही. अजूनही असंख्य विद्यार्थी भारतीय शास्त्रीय संगीतापासून, परंपरेने चालत आलेल्या लोकसंगीतापासून अनभिज्ञ आहेत.

नागपूर विद्यापीठाअंतर्गत येणाऱ्या अनेक महाविद्यालयांमध्ये संगीत विषय शिकविल्या जातो. संगीताची आवड असलेले अनेक विद्यार्थी या महाविद्यालयांमध्ये प्रवेश घेतात. परंतु त्यांच्यापैकी ९० टक्के विद्यार्थ्यांना (मुख्यत्वेकरून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना) संगीताच्या मूलभूत संकल्पनांची माहिती नसते, रागांची ओळख नसते. कारण शालेय जीवनात त्यांना संगीत शिक्षण मिळालेले नसते व तशी संधीही उपलब्धझालेली नसते. असे विद्यार्थी महाविद्यालयातून उत्तीर्ण तर होतात परंतु योग्य गुणवत्तेचा अभाव त्यांच्यात दिसून येतो व त्यामुळे उच्च शिक्षण घेणे, संगीतात करिअर घडवणे त्यांच्यासाठी कठिण असते.

## 5. शालेय विद्यार्थ्यांची संगीत शिक्षणाकडे ओढ कमी असण्याची कारणे व उपाययोजना करणे :

शालेय विद्यार्थ्यांची संगीत शिक्षणाकडे ओढ कमी असण्याचे मुख्य कारण म्हणजे योग्य मार्गदर्शनाचा अभाव होय. योग्य मार्गदर्शनाला विद्यार्थ्यांच्या जीवनात फार महत्व असते. योग्यवेळी योग्य निर्णय घेतले नाही तर त्याचा जीवनावर विपरीत परिणाम होऊन वैफल्य निर्माण होते. त्यामुळे योग्यवेळी योग्य निर्णय कसा घ्यावा यासाठी मार्गदर्शन हवे असते. याशिवाय अन्य कारणे म्हणजे –

- शालेय अभ्यासक्रमात संगीत विषयाला असलेले दुय्यम स्थान.
- शालेय शिक्षण व संगीत शिक्षणाच्या संबंधाविषयी असलेली अनभिज्ञता.
- 'संगीताचे मानवी जीवनातील महत्व'याविषयी असलेली अनभिज्ञता.
- संगीताकडे फक्त मनोरंजनाची कला म्हणून पाहणे.
- 'संगीतातील करिअर'याविषयी माहीती नसणे.
- संगीत शिक्षण ग्रामीण भागात उपलब्ध नसणे.

## उपाययोजना :

तज्ञांच्या मते व्यक्तीच्या सर्वांगीण विकासात, व्यक्तिमत्व सुसंस्कृत, प्रगल्भ व समृद्ध होण्यात इतर विषयांप्रमाणेच संगीत शिक्षणाचाही मोठा वाटा असतो. प्रत्येक देशाच्या संगीतातून त्या देशाच्या संस्कृतीची ओळख होते व संगीत शिक्षणातून संस्कृतीचे जतन केल्या जाते. त्यामुळे स्वत:चा विकास साधण्यासाठी व संस्कृती संवर्धनासाठी प्रत्येक विद्यार्थ्यांने संगीत शिकणे आवश्यक आहे. शालेय विद्यार्थ्यांची संगीत शिक्षणाकडे ओढ वाढवण्यासाठी त्यांनायोग्य मार्गदर्शन देण्याची आवश्यकता आहे वत्यासाठी योग्य उपाययोजनाकरण्याची गरज आहे.

- विद्यार्थ्यांच्या मनात लहान वयापासूनच संगीताची आवड निर्माण करणे.
- विद्यार्थी, पालक व शिक्षक यांच्यातील संगीतविषयक गैरसमज दूर करणे.
- संगीताचे महत्व विद्यार्थी, पालक व शिक्षक यांना पटवून देण्यासाठी मार्गदर्शक उपक्रमांचे विकसन करणे.
- संगीतातील करिअर व इतर व्यवसायांतील संगीताची उपयोगिता या विषयीची माहिति विद्यार्थी व पालकांना देणे.
- उद्देशपूर्ण, दर्जात्मक अशा शालेय संगीत अभ्यासक्रमाची निर्मिती करणे.
- आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून ग्रामीण भागापर्यंत संगीत शिक्षण पोहोचवीने.

## 6. निष्कर्ष :

थोडक्यात असे म्हणता येईल की, संगीतातील सूर आणि लय हे मानवाच्या रोमरोमात भिनलेले आहे.संगीताशिवाय मनुष्य जीवन नीरस आहे. शास्त्रीय दृष्टीकोनातून बघितले तर आजसंगीताचा समावेश ज्ञानातील सर्वोच शाखांमध्ये होतो आहे.फक्त संगीत क्षेत्रातच नव्हे तर, सर्वच क्षेत्रांमध्ये संगीताचा उपयोग आज होत आहे. सद्याचे युग हे स्पर्धात्मक युग आहे. यामध्ये टिकून राहण्यासाठी प्रत्येक विद्यार्थ्याला शिक्षणासोबतच इतर कलागुण आत्मसात करण्याची गरज आहे. स्वत:चा सर्वांगीण विकास करून घ्यावयचा आहे.त्यासोबतच आपल्या देशाची संस्कृती, नैतिक मूल्य व संस्कारांची जोपासनाही करायची आहे. संगीत कला ही देशाच्या संस्कृतीचे प्रतिक असून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीणव्यक्तिमत्व विकासासाठी आवश्यक असलेल्या सर्व गुणांनी संपन्न अशी कला आहे. त्यामुळे विद्यार्थी जीवनात सुयोग्य परिवर्तन घडवून आणण्यासाठी संगीताचे शिक्षण महत्वपूर्ण भूमिका निभावू शकते. यासाठी अधिकाधिक विद्यार्थ्यांना संगीत शिकण्यासाठी प्रोत्साहित करायला हवे. शालेय शिक्षणात संगीत अंतर्भूत करून त्याला इतर विषयांइतकेच महत्व द्यायला हवे. तसेच संगीतात विशेष प्रावीण्य मिळवू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शनाची व्यवस्था करणे व अधिकाधिक विद्यार्थ्यांनी संगीत शिकावे यासाठी मार्गदर्शक उपक्रमांचे विकसन करण्याची आवश्यकता आहे. कारण संगीत शिक्षणातून चांगले संस्कार घडविले जातात. चांगल्या संस्कारातून चारित्र्यसंपन्नव्यक्ती घडतात व चारित्र्यसंपन्न व्यक्ती एक उत्तम देश घडवतो.

## संदर्भ ग्रंथसूची :

1. डॉ. सौ. अलोणी, अर्चना.(२००७) संगीत अध्यापन पद्धती, विद्या प्रकाशन
2. देशपांडे, पु,ल. संगीताचं शिक्षण, संगीत कला विहार, ( जून २००६)
3. खरवंडीकर, दे, खं. शिक्षा का अर्थ, संगीत कला विहार, (मार्च २००८)
4. तिवारी, किरण. संगीत एवं मनोविज्ञान, कनिष्क पब्लिशर्स

5. तडवी, उत्तरा. महाविद्यालयीन शिक्षणामध्ये संगीताची सद्य:स्थिती आणि भावी प्रगतीच्या दिशा संगीत कला विहार, ( फेब. २०१३)
6. कांगुणे, एस, व्ही. मुलांना सर्जनशील बनवा, शिक्षण संक्रमन (ऑगष्ट २०१३)
7. करंदीकर, सुरेश. (२००८) शैक्षणिक मानसशास्त्र, फडके प्रकाशन
8. डॉ. चव्हान, गणेश. वर्तमान शिक्षणातील आस्थेचे नवविचार प्रवाह
9. घोरमोडे, के, यु. शैक्षणिक मार्गदर्शन आणि समुपदेशन, विद्या प्रकाशन

Web Search

10. Sounds Academy . “ Why Music Education ? www.soundsacademy.org
11. साठे, अमृता. अखंड राहावी संगीताची परंपरा, dailyhunt, (Publisher- Dainik Prabhat)